# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.02.2026** **वार:शुक्रवार**

1. राज्याची अर्थव्यवस्था 2032 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलरची होईल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
2. 2026 हे वर्ष 'भरती वर्ष' म्हणून राबवलं जाणार असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा
3. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार
4. भू-राजकीय तणावांच्या आव्हानांवर भारत व्यावहारिक धोरणातून मात करत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं मत
5. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज राज्यभरात होणार माय-मराठीचा जागर आणि
6. टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताची झिम्बाब्वेवर 72 धावांनी मात

**मुख्यमंत्री-मुंबई**

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून 2032 पर्यंत ती एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेला ते काल उत्तर देत होते. राज्याच्या अर्थव्यवस्थेत गेल्या अकरा वर्षांत तिप्पट वाढ झाली असून ती 13 लाख कोटींवरून 51 लाख कोटींवर पोहोचली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. दावोसमध्ये झालेल्या करारांपैकी 75 ते 80 टक्के करारांची अंमलबजावणी होत असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातील एकंदर परकीय गुंतवणुकीच्या 39 टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्र हे देशाचं स्टार्ट अपचं केंद्र आहे, असं सांगताना ते म्हणाले.....

**स्टार्टअप च्या संदर्भात देखील आपण स्टार्ट अप उद्योजकता आणि नाविन्यता धोरणाला मान्यता दिली. आता आपण जवळपास एकशे सेहचाळीस पेक्षा जास्त इन्क्युबेटर च जाळं या ठिकाणी तयार करतो आहोत. जवळपास सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाकरता पाचशे कोटी रुपयाच्या फंड ची आपण व्यवस्था केली आहे. आणि मला सांगताना आनंद वाटतो की आता देशाच्या स्टार्टअप इकोसिस्टम मध्ये देशाच स्टार्टअप हब बंगलोर नाही. देशाच स्टार्टअप हब हैदराबाद नाही. देशाचं स्टार्टअप हब हे महाराष्ट्र आहे. देशातल्या रजिस्टर्ड स्टार्टअप मध्ये सर्वाधिक स्टार्टअप ट्वेंटी पर्सेंट ओएफ ठे कंट्री महाराष्ट्रामध्ये आहेत. आणि त्याहीपेक्षा युनिकॉन्स देशामध्ये एकूण एकशे एकोणीस युनिकॉर्न आहेत. या एकशे एकोणीस युनिकॉर्न पैकी अठ्ठावीस युनिकॉर्न आपल्या महाराष्ट्रामध्ये आहेत. आणि म्हणून स्टार्टअप कॅपिटल म्हणून आज महाराष्ट्राकडे आपण पाहू शकतो.**

नाशिक कुंभमेळ्यामध्ये महाराष्ट्राचं नाव जागतिक स्तरावर उंचावण्याचा सरकारचा मानस आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात मराठी हीच सक्तीची भाषा राहील, इतर भाषा सक्तीच्या नसतील, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**उपमुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चेला उत्तर दिलं. महाराष्ट्रात एक नवी औद्योगिक क्रांती होत असून, राज्याच्या विकासाची गती आता कुणीही थांबवू शकणार नाही, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. राज्यात सुरू असलेल्या विकासयात्रेचं प्रतिबिंब राज्यपालांच्या अभिभाषणात उमटलं असं, ते म्हणाले. मुंबईसह संपूर्ण राज्यात सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत त्यांनी माहिती दिली. 2026 हे वर्ष 'भरती वर्ष' म्हणून राबवलं जाईल, 1 लाख 53 हजार पदांपैकी आता पर्यंत 85 हजार 363 उमेदवारांना नियुक्ती देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**विधीमंडळ-मुंबई**

विधानसभेत काल पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला सुरुवात झाली. श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शिवभोजन योजना अशा योजनांसाठी निधी मिळत नाही. जिल्हा परिषद शाळा बंद पडत आहेत, अनेक शाळांत शिक्षक नाहीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ट्रेनिंग सेंटर नाही अशा तक्रारींचा पाढा काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी वाचला. रोजगार हमी योजनेकडे सरकारचं दुर्लक्ष झाल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले. अजित पवार यांच्या विमान अपघाताशी संबंधित तथ्यं सरकारनं सभागृहासमोर मांडावीत, असे निर्देश विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. या प्रकरणी 28 तारखेला चर्चा करावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार शशिकांत शिंदे यांनी स्थगन प्रस्ताव मांडला होता.

**राष्ट्रवादी-मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड झाली आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी काल मुंबईत झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात ही घोषणा केली. प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला, त्याला सुनील तटकरे यांनी अनुमोदन दिलं आणि एकमताने त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पार्थ पवार यांच्या उमेदवारीची घोषणाही प्रफुल्ल पटेल यांनी केली.

**सीआयडी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या विमान दुर्घटनेच्या तपासाबाबत महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभागाने काल पुण्यात पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. या प्रकरणाचा तपास अत्यंत सखोल आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जात आहे. अपघात घातपात होता का, किंवा निष्काळजीपणामुळे अपघात घडला का, याचा तपास करण्यावर गुन्हे अन्वेषण विभागाचा भर असेल, असं अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद यांनी सांगितलं.

**जयशंकर-पुणे**

सध्याचं दशक हे अशांततेचं दशक आहे. आगामी काळातही भू राजकीय तणावाची तीव्रता कायम असेल, मात्र, भारत आपल्या मुत्सद्दी, संयत आणि व्यावहारिक धोरणांद्वारे या आव्हानांना तोंड देत आहे, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी मांडलं. पुणे इंटरनॅशनल सेंटरने आयोजित केलेल्या, 'आशिया आर्थिक संवाद' परिषदेच्या उद्घाटन सत्रात काल त्यांचा ध्वनीमुद्रित संदेश प्रसारित करण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर क्षेत्र, डेटा, दुर्मिळ खनिजे हे आता केवळ विकासाचे घटक नसून, राष्ट्राची बलस्थानं बनली असल्याचं त्यांनी सांगितलं. नुकत्याच झालेल्या एआय इंपॅक्ट समिटमुळे भारताच्या डिजिटल क्षेत्रातील क्षमता अधोरेखित झाल्या आहेत, असं ते म्हणाले. या परिषदेत, कर, तंत्रज्ञान, धोरणात्मक सुसंवादासह भू-आर्थिक विकासावर चर्चा होईल अशी अपेक्षा जयशंकर यांनी व्यक्त केली.

**मराठी भाषागौरव दिन**

कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन आज राज्यात 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जात आहे. त्यानिमित्तानं राज्यभरात मायमराठीचा जागर होणार आहे. ऐकुया अधिक वृत्तांत....

**छत्रपती शिवाजी महाराजांनी जी राज्य कारभाराची भाषा बनवली, ज्ञानोबा तुकोबा यांच्यासारख्या संतांनी ज्या भाषेमधून अभंग-ओव्या लिहिल्या त्या मायमराठीला आता अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. याच मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आज राज्यभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्य विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमाचं तसंच 'आचार्य अत्रे आणि पु.ल. देशपांडे : विनोदाची दोन शिखरे' या विषयावर संवादात्मक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.**

**नाशिकमध्ये आजपासून चौथ्या विश्व मराठी संमेलनाचं औपचारिक उद्घाटन होणार आहे. या संमेलनाच्या अनुषंगानं मराठीतल्या बोलीभाषा महोत्सवाचं उद्घाटन काल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झालं. मराठीतल्या विविध बोली भाषा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. याच बोली भाषांनी मराठीला समृद्ध आणि संपन्न केलं आहे, असे गौरवोद्गार कर्णिक यांनी यावेळी काढले. या महोत्सवात जळगावमधल्या परिवर्तन संस्थेच्या कलाकारांनी बहिणाबाईंची गाणी आणि कविता यावर आधारित 'अरे संसार संसार' हा कार्यक्रम सादर करीत उपस्थितांची मनं जिंकली.**

**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त राज्यात ठीकठिकाणी अभिजात साहित्याचं अभिवाचन, मराठी गीतांचं सादरीकरण तसंच विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. 'माझा मराठाचि बोलु कौतुकें' ही भावना केवळ उच्चारात न राहता कृतीत उतरावी, मराठीचा वापर वाढावा, तिचं संशोधन-संवर्धन व्हावं आणि जागतिक पातळीवर मराठीची पताका अभिमानाने फडकवी, यासाठी सर्वच मराठी जनांनी पुढाकार घ्यायला हवा, आजच्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हीच अपेक्षा व्यक्त करू या...! आकाशवाणी बातम्यांसाठी नाशिकहून संजय पाठक यांच्यासह माधुरी कुलकर्णी पुणे.**

**स्वातंत्र्यवीर सावरकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल राज्यात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पुण्यात सावरकर स्मारक तसंच फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातल्या, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचं वास्तव्य असलेल्या खोलीला, काल अनेक नागरिकांनी भेट देत अभिवादन केलं. विविध संस्था संघटनांच्या वतीनं व्याख्यानं, सांगीतिक कार्यक्रम, अभिवाचन, नाट्य सादरीकरण अशा विविध कार्यक्रमातून सावरकर विचारांचं स्मरण करण्यात आलं.

**क्रिकेट-टी-20**

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'सुपर एट' फेरीत, काल चेन्नईत झालेल्या सामन्यात, भारताने झिम्बाब्वेचा 72 धावांनी पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करत 257 धावांचं आव्हान दिलं, त्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला निर्धारित 20 षटकांत केवळ 184 धावाच करता आल्या. अहमदाबादमध्ये झालेल्या अन्य एका सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडिजचा 9 गडी राखून पराभव केला.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.